# कंत्राटी पदभरती जाहिरात
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

शहर आरोग्य सोसायटी, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

| Sr. No | Name of Post (Program) | Place of Posting | No. of Post & Category | Qualification | Experience | Remuneration (Per month Cosolidated) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Nurse | NUHM-5 | SC-1<br>ST-1<br>OBC-1<br>EWS-1<br>Open1<br>Total-5 | GNM/B.Sc Nursing. Medical Nursing Council Registration | NIL | 20,000/- |
| 2 | A.N.M. (Female) | NUHM-10 | OBC-3<br>EWS-1<br>Open-6<br>Total - 10 | SSC, ANM Course Completed, Medical Nursing Council Registration | 1year Experience | 18,000/- |

समांतर आरक्षण खालीलप्रमाणे

| Sr. no. | Name of Post | Category | Total vacancy | General | Parallel Reservation | | | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Female | Ex Service man | Sport man | Project Affected | Part time Employees | |
| 1 | Staff Nurse | SC-1<br>ST-1<br>OBC-1<br>EWS-1<br>Open - 1 | 5 | 5 | | | | | | 5 |
| 2 | A.N.M. (Female) | OBC-3<br>EWS-1<br>Open-6 | 10 | 10 | | | | | | 10 |

**अटी व शर्ती :-**

१) अर्ज दिलेल्या नमुन्यात परिपूर्ण भरलेला असावा. अर्जामध्ये माहिती अपूर्ण असल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. याबाबत असलेली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही, तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही, तसेच अर्जदाराला शासकीय- नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल. शासकीय, निमशासकीय, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

६) एकापेक्षा अधिक पदाकरिता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

७) निवड यादीतील उमेदवारांना गुणानुक्रमानुसार प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

८) राखीव प्रवर्गातील उमेदवार न मिळाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

९) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील.

१०) उपरोक्त पदांकरिता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करून गुणनुक्रमे यादी तयार करण्यात येवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल किंवा निवड समितीने घेतलेल्या निर्णयानुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. त्याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आरोग्य सोसायटी, अहमदनगर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याचे मागणी करता येणार नाही.

१२) उपरोक्त पदांकरिता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास अपात्र दरविले जाईल.

१३) पदभरती प्रक्रिया रद्द करणे / स्थगित करणे / पदांची संख्या कमी जास्त करणेबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आरोग्य सोसायटी, अहमदनगर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१४) दोनपेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या उमेदवारांचे अर्ज पात्र केले जाणार नाही. सोबत जोडण्यात आलेला नमुना भरून अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१५) दिनांक २८/०३/२००५ च्या पत्रानुसार दोनपेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या उमेदवारांचे अर्ज पात्र केले जाणार नाही. सोबत जोडण्यात आलेला नमुना भरून अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१६) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतींसह आपले अर्ज मा.आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आरोग्य सोसायटी, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे नावे आरोग्य विभाग, जुनी महानगरपालिका, यतिम खाना समोर, माळीवाडा, अहमदनगर येथे दि.२९/१/२०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) व्यक्तीशः/टपालाद्वारे सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१७) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना रु.१००/- चा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे व डिमांड ड्राफ्टच्या मागे स्वतःचे नांव स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राफ्ट "M/S.IN HLT & FA WE SO RCH PH II AMC A'NAGAR" यांचे नावे देय असावे.

१८) सदरहू भरती प्रक्रियेकरिता अर्ज दिनांक २९/१/२०२४ अखेर राहणार असून तद्नंतर अर्जाची छाननी, लेखी परीक्षा/मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती / आक्षेप प्राप्त करून घेणे व त्या निकाली काढणे

आदी रितसर शासनाच्या, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशील वेळोवेळी अहमदनगर महानगरपालिकेच्या संकेत स्थळासह https://arogya.maharashtra.gov.in प्रसिध्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. याबाबत पुन:श्च व्यक्तीशः / दूरध्वनी / ई-मेल अथवा वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही.
**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** :- १) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका, २) जातीचे प्रमाणपत्र, ३) शाळा सोडल्याचा / जन्मतारखेचा दाखला (Leaving / TC Certificate ), ४) शासकीय अनुभव असलेले प्रमाणपत्र, ५) नमुना अर्जात संपूर्ण माहिती.